महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.१२०३/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २० सप्टेंबर, २०१९.

प्रस्तावना -

१. जिजाऊ विद्या प्रतिष्ठान, भोसे वडगाव, ता खेड, जि पुणे संचलित होली एंजल्स स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, गट नं.९११, भोसे, ता खेड, जि पुणे या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत जिजाऊ विद्या प्रतिष्ठान, भोसे वडगाव, ता खेड, जि पुणे संचलित होली एंजल्स स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, गट नं.९११, भोसे, ता खेड, जि पुणे या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ / सुरू करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) संथेने गट नं.९११, भोसे, ता खेड, जि पुणे येथील सादर केलेल्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जफेड केल्याबाबतची व सदर प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरू केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रूपये एक लक्ष इतका दंड वसूल करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक

असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस I) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, II)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढशाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२०.०८.२०१९

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जि प पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२, प्र.क्र.१२०३/१९)

शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११००१.
दूरध्वनी : (020)26126463
e-mail: doesecondary@gmail.com
website WWW.mahdoesecondary.com

क्र.आमाशा/स्वयंअर्थ/२०१८/१७-१८/३०१/5407
दिनांक- 19 AUG 2019

प्रति,
**मा.अपर मुख्य सचिव,**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१९-२० चे ऑफलाईन प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत.**

संदर्भ :
१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.०९/०७/२०१९.
२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२४/०७/२०१९.
३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०६/०७/२०१९.
४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१९/०६/२०१९.
५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०८/०३/२०१९.
६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१५/०७/२०१९.
७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१५/०७/२०१९.
८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१५/०७/२०१९.
९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१५/०७/२०१९.
१०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि०७/०६/२०१९.
११) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. ०७/०६/२०१९
१२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०७/०६/२०१९.
१३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२३/०५/२०१८.
१४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०५/०७/२०१९.
१५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.०५/०७/२०१९.
१६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०५/०७/२०१९.
१७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.११/०७/२०१९.
१८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
१९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. १६/०७/२०१९.
२० शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. १८/०७/२०१९.
२१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि. १८/०७/२०१९.
२२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१०/०७/२०१९.
२३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.११/०७/२०१९.
२४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०५/०७/२०१९.

..२/-

२५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२९/०६/२०१९.
२६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१८/०७/२०१८.
२७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
२८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
२९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
३०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
३१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१६/०७/२०१९.
३२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०१/०५/२०१९.
३३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०९/०७/२०१९.
३४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१६/०२/२०१९.
३५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१०/०७/२०१९.
३६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०१/०७/२०१९.
३७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२३/०७/२०१९.
३८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०१/०६/२०१९.
३९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१०/०७/२०१९.
४०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१०/०७/२०१८.
४१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२६/०६/२०१९.
४८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१९/०७/२०१९.
४९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२४/०७/२०१९.
५०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२४/०७/२०१९.
५१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२,दि.१३/०६/२०१९.
५२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.११/०६/२०१९.
५३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१२/०६/२०१९.
५४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१३/०५/२०१९.
५५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.२८/०६/२०१९.
५६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.०९/०७/२०१९.
५७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. २४/०६/२०१९.
५८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. २४/०६/२०१९.
५९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१९/प्र.क्र.१८/एसएम-२, दि. २४/०६/२०१९.
६०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२४/०६/२०१९.

महोदया,

सदर विषयाचे कृपया अवलोकन व्हावे. संचालनालयाचे समक्रमांक दि. ०६/०५/२०१६ नुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांकरिता सन २०१६-१७ या वर्षा साठी संचालनालयाकडे ऑनलाईन प्राप्त झालेले प्रस्ताव शिफारसीसह एकत्रीतरित्या शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले होते.

संचालनालयास संदर्भ क्र. १ ते ६० नुसार प्राप्त झालेले स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांकरिताच्या प्रस्तावाबाबतची शासन पत्रे व त्यास अनुसरून प्राप्त झालेले एकूण ६०. ऑफलाईन प्रस्ताव विहित प्रपत्रात संचालनालयाच्या अभिप्रायासह यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया स्वीकृत व्हावेत , ही विनंती.

आपला विश्वासू,

(दिनकर पाटील)
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक
म.रा. पुणे-१.

प्रत :

१. मा.आयुक्त शिक्षण,शिक्षण आयुक्तालय, म.रा.पुणे यांना सविनय सादर
२. श्री. रा.वि.कुडले , कार्यासन अधिकारी, (एस.एम.-२ ) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०००३२.यांना माहितीस्तव.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | पुणे | जिजाउ विद्या प्रतिष्ठाण भोसे वडगाव रोड,ता.- खेड, जि.- पुणे. | होली एंजल्स स्कुल अँन्ड ज्युनिअर कॉलेज, भोसे ,ता. खेड, जि. पुणे. | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इ. १ ली ते १२ वी ) (सर्व शाखा) | इंग्रजी | शासन निर्णयार्थ सादर | १) सदर संस्थेने दि. ३०/११/२०१५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव दाखल केला नाही तथापी प्रस्तावासाठीचे आवश्यक चलन रु ३००००/- मुदती नंतर दिनांक ०१/०६/२०१९ व दि. ०२/०७/२०१९ रोजी भरणा केलेले आहे. २) संस्थेने मौजे भोसे ,ता. खेड, जि. पुणे. येथील सर्व्हे नं. १११ मधील ४० आर जागेचा ३० वषू मुदतीचा नोंदणीकृत भाडेकराराची प्रत जोडली आहे. ३) संस्थेने बँक ऑफ महाराष्ट्र ची दि. २६/०४/२०१९ ची रू ५ लाखाची ५ वर्ष मुदतीची मुदतठेव पावती. जोडली आहे. ४) संस्थेच्या प्रस्तावासोबतच्या अन्य कागदपत्रामध्ये सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत , संस्थेची घटना , इ. नवीन शाळेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे जोडली आहेत. ५) सदर प्रस्ताव विहित मुदतीतील नाही. सबब सदर संस्थेचा नवीन शाळा प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इ. १ ली ते १२ वी .) साठी चा ऑफलाईन प्रस्ताव शासन स्तरावर निर्णयार्थ सादर. |
| १० | सांगली | [illegible] शिक्षण [illegible]ारक संस्था, सलगरे, ता. मिरज, जि. सांगली. , | बी.एस. पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सलगरे, ता. मिरज, जि. सांगली. , | नवीन शाळा | [illegible] | प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी ) | मराठी | शासन निर्णयार्थ सादर | १) सदर संस्थेने दि. ३०/११/२०१५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव दाखल केला नाही तथापी प्रस्तावासाठीचे आवश्यक चलन रु ३००००/- मुदती नंतर दिनांक २४/०७/२०१९ रोजी भरणा केलेले आहे. २) संस्थेने स्वतःच्या मालकीचा मौजे सलगरे, ता. मिरज, जि. सांगली. , येथील सर्व्हे नं. २३ मधील १ हे. ८८ आर जागेचा ७/१२ ची प्रत जोडली आहे. ३) संस्थेने देना बँक ची दि. २३/०७/२०१९ ची रू ६.५ लाखाची ३ वर्ष मुदतीची मुदतठेव पावती. जोडली आहे. ४) संस्थेच्या प्रस्तावासोबतच्या अन्य कागदपत्रामध्ये सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत , संस्थेची घटना , इ. नवीन शाळेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे जोडली आहेत. ५) सदर प्रस्ताव विहित मुदतीतील नाही. सबब सदर संस्थेचा नवीन शाळा प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी ) साठी चा ऑफलाईन प्रस्ताव शासन स्तरावर निर्णयार्थ सादर. |